अर्धसाप्ताहिक

सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा...

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 01 जानेवारी 2026 | वर्ष 11 वे | अंक 16 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# बच्चू कडूंचा ०३ जानेवारीला नागभीड येथे एल्गार

## सावकारी जाचापोटी शेतकऱ्याकडून किडनी विक्री प्रकरण

नागभीड/प्रतिनिधी

सावकारी कर्जाच्या विळख्यात अडकून नागभीड तालुक्यातील मिंथूर येथील एका तरुण शेतकऱ्याला आपली किडनी विकण्याची वेळ आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असून, पीडित शेतकरी रोशन कुडे याला न्याय मिळवून देण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी ३ जानेवारी रोजी नागभीड येथे भव्य 'शेतकरी मोर्चा' काढण्याचे जाहीर केले आहे.

**१ लाखाचे झाले ७४ लाख :** किडनी विक्रीची हृदयद्रावक कहाणी... मिंथूर येथील तरुण शेतकरी रोशन कुडे याने काही काळापूर्वी सावकारांकडून १ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. मात्र, सावकारांनी लावलेल्या अवाढव्य व्याजदरामुळे या कर्जाचा डोंगर तब्बल ७४ लाख रुपयांवर जाऊन पोहोचला. कर्ज फेडण्यासाठी रोशनने घरातील वस्तू आणि मालमत्ता विकली, तरीही सावकारांचा तगादा कमी झाला नाही. अखेर हतबल होऊन रोशनने फेसबुकवरील 'किडनी डोनर



कम्युनिटी' पेजद्वारे किडनी विक्रीचा मार्ग निवडला. तेथे तो डॉ. कृष्णा नावाच्या एका कथित एजंटच्या संपर्कात आला. या एजंटच्या सांगण्यावरून रोशन कोलकात्यामार्गे कंबोडियाला गेला आणि तिथे त्याने आपली किडनी विकली. या प्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत ६ सावकारांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

**राज्य सरकारवर बच्चू कडूंचा प्रहार :** पीडित रोशन कुडे याच्या भेटीसाठी बच्चू कडू यांनी मिंथूर गावाला भेट दिली. यावेळी त्यांनी कुटुंबाची विचारपूस करत सरकारवर जोरदार टीका केली. कडू म्हणाले की, 'पुरोगामी महाराष्ट्रात शेतकऱ्याला कर्ज फेडण्यासाठी आपली किडनी विकावी लागते, ही राज्यासाठी अत्यंत लाजीरवाणी बाब आहे. राज्य सरकार शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण राबवण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आहे. आता शांत बसून चालणार नाही, तर सरकारला जागे करण्यासाठी संघर्षाची गरज आहे.'

**काय आहेत मोर्चाच्या प्रमुख मागण्या?**

या मोर्चाच्या माध्यमातून बच्चू कडू आणि आयोजन समितीने खालील मागण्या मांडल्या आहेत: पीडित शेतकऱ्याचे आर्थिक शोषण करणाऱ्या सर्व दोषी सावकारांवर 'महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा' (MCOCA)

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# लग्नाला पोरगीही मिळेना: सोनंही परवडेना...!

## लग्नाचं पोर अन् जीवाला घोर...



लग्नाच पोर अन् जीवाला घोर

ब्रम्हपुरी/का.प्र.

पूर्वीच्या काळी मुलगी लग्नाच्या वयात आली की आई-बापाच्या जिवाला घोर लागायचा. आता परिस्थिती उलट आहे. मुलाच्या आई-वडिलांनाच सून शोधण्यासाठी दाहीदिशा हिंडावे लागत आहे. त्यात लग्न जुळलेच तर दागिने परवडेनात, हॉल आणि जेवणाचा खर्चही झेपेना. त्यामुळे मुलांची लग्ने आई-वडिलांची झोप उडवत आहेत.

लोकसंख्येचा विचार करता राज्यात मुलींची संख्या खूपच कमी आहे. वंशाचा दिवा मुलगाच हवा, ही प्रवृत्ती अजूनही संपलेली नाही. कायद्याने लिंग निदानाला बंदी असली तरी अजूनही स्त्रियांच्या पोटातील गर्भाचे निदान करून तो गर्भ स्त्रीचा असल्यास गर्भपात करून नष्ट करण्यात येण्याचे प्रकार छुप्या पद्धतीने सुरूच आहेत.

अलीकडे राज्यात साधारणपणे एक हजार मुलांमागे ८७० ते ९५० च्या दरम्यान मुलींचा जन्मदर राहिला आहे. मुलींचा जन्मदर सातत्याने कमी होताना दिसत आहे. नागपूर आणि पुण्यासारख्या शहरांमध्ये तो ९०० पर्यंत आहे. मुंबईमध्ये तो ९१४ च्या आसपास आहे. त्यामुळे ३५ ते ४० चे वय झाले तरी बाशिंग गुडघ्यालाच अशी मुलांची स्थिती आहे.

मुलगी न मिळण्यामागे त्यात आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे मुली खूप शिकतात आणि मोठी पॅकेज मिळवतात. बहुसंख्य मुलांची गाडी मात्र पदवीपर्यंतच अडकते. मग पंचवीस ते तीस हजार पगारावरच त्यांना समाधान मानावे लागते त्याचवेळी त्यांच्या वयाच्या मुली मात्र ६० ते ७० हजारपेक्षा जास्त पॅकेज घेतात. त्यातही समजा मोठ्या मनाने मुलीकडच्यांनी लग्नाला तयारी दर्शवलीच तर दागिने परवडत नाहीत. लग्न म्हटले की साडेतीन तोळ्याचे मंगळसूत्र, अर्ध्या तोळ्याची अंगठी, अर्धा तोळ्याच्या कानातल्या रिंगा, राहिली नाकातली नथ. पण, आपल्याकडे अनेक भागांत वडील मुलीचे नाक कधी दुसऱ्याच्या हातात जाऊ देत नाहीत. म्हणजे नाही म्हटले तरी साडेचार तोळे सोने आलेच.

**सोन्याचे दर :**
**प्रति १० ग्रॅम १ लाख ४५ हजार**
**चांदीचा दर :**
**प्रति १ किलोग्रॅम २ लाख ५५ हजार**
**घडणावळ :**
**१८ टक्के अधिक जीएसटी (३%)**

आजचा सोन्याचा भाव पाहता हा आकडा नवरदेवाच्या वडिलांच्या डोक्यावरून जातो. त्यात हॉलचे भाडे वेगळे. जेवणाचे एक ताट २०० ते ५०० रुपयांच्या खाली नाही. तिथेही हॉलवाल्यांची मोनोपॉली. दोन्हीकडची मिळून पाचशे ताटे पकडली तरी २.५ लाख होतात. बाकी कपडालत्ता, मानपान आलेच. त्यातही आता साखरपुडा आणि हळदीचा खर्च लग्नाइतका करण्याची फॅशन आली. मग कसे परवडणार लग्न...?



## संपादकिय...

# नववर्षाचे स्वागत असे करा...

इंग्रजी दिनदर्शिकेनुसार नविन वर्षाला आज सुरूवात झाली असुन ३१ डिसेंबरच्या रात्री नववर्षाचे स्वागत व सरते वर्ष दारू पिऊन करण्याकडे तरुण वर्गाचा कल असतो. नववर्षाच्या पूर्वसंध्येला हॉटेल बारमध्ये जाऊन पार्टी करणे, दारू पिऊन गाडी चालवणे, हुल्लडबाजी करणे, सायलंसरच्या पुंगळ्या काढून आवाज करणे, मोठ्या आवाजाचे फटाके वाजवणे, डिजेच्या किंवा लाऊड स्पिकरच्या कर्णकर्कश आवाजात भिभत्स नृत्य करणे यासारख्या गोष्टी तरुण वर्गामार्फत केल्या जातात.

यावर्षी तर हे प्रमाण खूपच आहे कारण शासनानेच बार पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू ठेवण्यास परवानगी दिली आहे. पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू राहणार असल्याने तरुणांनी आतापासूनच पार्टीची तयारी सुरू केली आहे. तर आपणावर पोलिस प्रशासनाची करडी नजर असुन दारू पिवून कोणीही गाडी चालवू नये तसे केल्यास आपणास पोलिसांच्या मोठया दंडाला अथवा कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. नववर्षाचे अशाप्रकारे स्वागत करणे म्हणजे कायदा सुव्यवस्थेचा भंग करणे हे माहीत असूनही अशा गोष्टी केल्या जातात. अलीकडे तर या गोष्टी खूपच वाढल्या आहेत. दारू पिऊन नववर्षाचे स्वागत करण्याची फॅशनच हल्ली रूढ झाली आहे. नववर्षाच्या पूर्वसंध्येला दारू पिलीच पाहिजे असाच समज तरुण वर्गाचा झाला आहे. दारू न पिताही नववर्षाचे स्वागत करता येते यावर त्यांचा विश्वासच नाही त्यामुळेच नववर्षाचे स्वागत दारू पिऊनच केले जाते. दारूचे दुष्परिणाम माहीत असूनही या गोष्टी केल्या जातात. दारू पिऊन भरधाव वेगात गाड्या चालवतात. दारू पिऊन भरधाव वेगात गाडी चालवल्याने बऱ्याचदा अपघात होतात. या अपघातात काही जण मरण पावतात तर काही जण जखमी होतात काही तर काही जण कायमचे जायबंदी होतात. दारू पिऊन गाडी चालवल्याने झालेल्या अपघातात घरातील कर्ता पुरुष गेल्याने कुटुंब रस्त्यावर येते. दारू पिऊन गाडी चालवणे म्हणजे स्वत: सह इतरांचाही जीव धोक्यात घालणे म्हणूनच नववर्षाचे स्वागत करताना स्वत:सह इतरांना त्रास होणार नाही याचे भान सर्वांनी ठेवावे.

सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नव्या वर्षाचे स्वागत करताना बंधनाची ऐशीतैशी होणार नाही याची काळजी सर्वांनीच घ्यायला हवी. नववर्षाचे स्वागत म्हणजे चांगल्या वाईट गोष्टी दूर सारुन नववर्षाच्या सूर्योदयाच्या साक्षीने नव संकल्पाचा अवलंब करणे, त्याचे निश्चित धोरण ठरवणे, सत्याची कास धरणे आणि नव्या जोमाने, नव्या उत्साहाने कामाला लागणे. यामुळे नव्या वर्षाचे स्वागत करताना पाश्चात्यांचे अंधानुकरण बंद करून प्रत्येकाने चांगले काम करण्याचा संकल्प केला पाहिजे. आज जगाचा पोशिंदा संकटात आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांने पिचलेला बळीराजा आत्महत्या करीत आहेत. देशाचे रक्षणकर्ते जवान दहशतवाद्यांच्या, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात शहीद होत आहेत. दारूच्या नशेत नववर्षाचे स्वागत करण्यापेक्षा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले, तसेच महापुरात वाहून गेलेल्या जमिनी व शेतकऱ्यास मदत करणे, शहीद जवानांची मुले तसेच अनाथ मुलांना मदत करून आपण नव वर्षाचे स्वागत करू शकतो. आर्थिकदृष्ट्या गरीब कुटुंबाना आर्थिक मदत करून त्यांच्या मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून, गोरगरीब मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून, वृद्धाश्रमाला, अनाथ आश्रमाला आर्थिक मदत करून आपण नववर्ष साजरे करू शकतो. रक्तदान म्हणजे सर्वश्रेष्ठ दान. नववर्षाची सुरुवात जर आपण रक्तदान करून केली तर एखाद्या रुग्णाचे प्राण वाचवल्याचे समाधान आपल्याला मिळू शकते. नवीन वर्षात अवयव दानाचा संकल्पही आपण करू शकतो. अशा प्रकारे नुतन वर्षाच स्वागत करूया.

अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार वाचा या लिंक वर...
www.bramhapurisamachar.com/bs

# ने.हि. महाविद्यालयातील दोन एनसीसी कॅडेट्सची भारतीय सैन्यात अग्निवीर म्हणून निवड



ब्रह्मपुरी/का.प्र.

ने. ही. महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथील २० महा बटालियन एन सी सी नागपुर चे एन सी सी कॅडेट वीर शेटिये व कुणाल नेवारे यांची भारतीय सैन्यात अग्निवीर म्हणून निवड झाली असून या वर्षी ने ही कॉलेज च्या एकंदरित १२ कैडेट्स ची अग्निवीर म्हणून निवड झालेली आहे. ही बाब महाविद्यालय व परिसरासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे.

या दोन्ही कॅडेट्सच्या या उल्लेखनीय यशाबद्दल नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव मान. अशोकजी भैया यांनी विशेष कौतुक केले व त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकर आणि पर्यवेक्षक प्रा आनंद भोयर यांनी कॅडेट्सचे मन:पूर्वक अभिनंदन करून हे यश महाविद्यालयाच्या एन सी सी परंपरेसाठी गौरवास्पद असल्याचे सांगितले. कैप्टन अभिजीत परकरवार आणि केयर टेकर ऑफिसर प्रा. रेवनदास बोरकर यांनी सुद्धा कैडेट्स चे अभिनंदन करुन त्याना शुभेच्छा दिल्या. कॅडेट्सच्या मेहनतीचे व सातत्यपूर्ण प्रशिक्षणाचे कौतुक केले आणि भविष्यात ते भारतीय सैन्यात उत्तम सेवा बजावतील, असा विश्वास व्यक्त केला.

याप्रसंगी सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व कैडेट्सनी कैडेट वीर शेटिये व कुणाल नेवारे यांचे अभिनंदन केले. या उल्लेखनीय यशामुळे ने. ही. महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथील एन सी सी यूनिट ची गुणवत्ता व राष्ट्रसेवेची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

जल है तो कल है...

# आयुर्वेद व वनौषधी प्रशिक्षण शिबीर संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील भू वैकुंठ अड्याळ टेकडी येथे दोन दिवसीय आयुर्वेद व वनौषधी प्रशिक्षण शिबिर संपन्न झाले. २७ डिसेंबर रोज दुपारी १२ वाजता सत्संग भवन अड्याळ टेकडी येथे दीपप्रज्वलन व अधिष्ठान पूजन करून संचालक सुबोधदादा, उद्घाटक डॉ सतीश गोगुलवार (कुरखेडा), शिबिर संयोजक डॉ गिरीश शेंडे, अध्यक्ष डॉ नवलाजी मुळे, डॉ आर के राखडे, डॉ नरेश देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाने शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.



प्रसंगी डॉ नरेश देशमुख यांनी त्वचा विकारावर, डॉ रामेश्वर राखडे यांनी वात विकार व स्वयंपाक घरातील औषधी या विषयावर डॉ श्वेताताई राखडे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. दिनचर्या व ऋतुचर्या विषयावर शिबिर संयोजक डॉ. गिरीश शेंडे यांनी मार्गदर्शन केले. सामुदायिक प्रार्थनेवर मार्गदर्शक सुबोधदादा यांनी मार्गदर्शन करताना सामुदायिक प्रार्थना हे कसे संस्कार, आरोग्य, संस्कृती, एकाग्रता व आपले धैर्य वाढविण्याचे एक महत्त्वपूर्ण अधिष्ठान आहे, हे सांगितले.

२८ डिसेंबर ला सकाळी वैद्य चलाख व वैद्य प्रकाश उरकुडे यांच्या मार्गदर्शनात अड्याळ टेकडी वनौषधी सर्वे प्रशिक्षण घेण्यात आले. स्त्रियांचे रोग या विषयावर डॉ पल्लवी चिलबुले, गर्भसंस्कार संगोपन या विषयावर डॉ ऐश्वर्या ढोले (वरोरा), डोळ्यांचे आजार विषयावर डॉ रोहित चिलबुले यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. अंतिम समारोपीय सत्रात आयुर्वेद माध्यमातून रुग्ण चिकित्सा विषयावर डॉ. अनिल देशमुख यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. सुश्री रेखाताई व लक्ष्मीताई यांनी शिबिराची भोजन व्यवस्था सांभाळली.

डॉ गिरीश शेंडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक विषद केले. अड्याळ टेकडी अध्यक्ष डॉ नवलाजी मुळे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. सदर शिबिरात चंद्रपुर, नागपूर, भंडारा, गडचिरोली, मुंबई, सातारा, नवनीतपूर, गोंदिया, यवतमाळ इत्यादी जिल्हातून विविध लोकांनी सहभाग घेतला.

नियमित वाचा
अर्धसाप्ताहिक
ब्रम्हपुरी समाचार

## विनोदिनी

रामलाल आजोबा डोके खूप दुखत असल्यामुळे डोळयांच्या दवाखान्यात गेले...
त्यांचे चेकअप केल्यानंतर नर्स म्हणाली...
वयाच्या मानाने तुमची तब्येत एकदम ठणठणीत आहे... पण नजर खूप वाईट आहे...
हे ऐकून रामलाल आजोबांनी तिला जवळ बोलावलं आणि तिला विचारले की मी तुला वाईट नजरेने पाहिले का... नाही ना... मला मान्य आहे... मला मला दिसायला थोडी अडचण होते... त्याला नजर नव्हे दृष्टी म्हणतात आणि वाईट नव्हे अधू म्हणतात.... असे शब्द वापरून उगीच मला बदनाम करु नको...!!!

# समाजमाता क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले

जगातील सर्वच देशांत व संस्कृतीत स्त्री ही अतिदुर्लक्षित राहिली आहे. सर्वच समाजरचनामध्ये स्त्रीची भूमिका घरापुरती मर्यादित ठेवली गेली आणि एकूण जीवन व्यवहारात तिला दुय्यम स्थान देण्यात आले. स्त्रीला शिक्षण देण्याचा विचारही समाजाच्या मनात आला नाही, उलट तिला अज्ञानात ठेवण्यात आले व तसे करण्याचा अभिमान बाळगला गेला. पुरूषप्रधान संस्कृतीने स्त्रीचे हक्क तर डावललेच, शिवाय तिला अमानुष वागणूक दिली. पुरूषाने स्त्रीचा साधन म्हणून उपयोग केला. शिक्षण व सुधारणांपासून वंचित ठेवले.

धर्मग्रंथानी तर हवे तसे नियम करून स्त्रीला शिक्षण प्रतिष्ठा नाकारली. तिला माणुसकीचे हक्क नाकारले. विविध धर्मांनी स्त्रीला उपास-तापास, पूजाअर्चा व इतर अंधश्रध्दात गुंतवून ठेवले. हे जीवन स्त्रियांच्या इतके अंगवळणी पडले की, यापेक्षा दुसरे काही असू शकते असा विचारही त्यांच्या मनात येऊ शकला नाही. सतत सांगितल्याने असत्यही सत्य वाटू लागते अशातलाच हा प्रकार.

या साऱ्यांचा परिणाम असा झाला की, आपण दुर्बल, कुचकामी आहोत असे त्यांच्या स्वाभाविक क्षमता न वापरल्यामुळे नाश होत गेल्या, त्यांचा पराक्रमाच्या आणि बुध्दिच्या गोष्टी फक्त पुरूषांनीच करायच्या असतात स्त्रियांनाही वाटू लागले. आत्मविश्वास क्षीण झाला. असे त्यांनाही वाटू लागले. या सर्वांचा समाजावर विघातक परिणाम झाला. ज्ञात इतिहासात पराक्रमी, कर्तबगार स्त्रियांची काही तुरळक उदाहरणे आढळतात. पण ती सन्माननीय अपवाद म्हणून सोडून दिल्यास वैचारिक प्रवासात गत्यंतर उरत नाही.

१९ व्या शतकातील महात्मा फुले यांच्या काळातील स्त्रियांची अवस्था फार हलाखीची तर त्यांच्या समस्या फार गंभीर होत्या. स्त्रियांना सार्वजनिक जीवनात भाग घेता येत नव्हता, शाळेत शिकता येत नव्हते. कोणत्याही नव्या विचारांचा स्पर्श होणार नाही याची कटाक्षाने काळजी घेतली जात असे. खाली मान घालून काम करणे एवढेच तिला माहीत होते. असे सातत्याने केल्याने तिच्या सरावाचे रूपांतर सवयीत केव्हा झाले हे तिलाही कळले नाही. या सवयीलाच संस्कार हे गोंडस नाव देण्यात आले. परिणामी स्त्रीने वर बघून बोलणे ही कल्पना पुरूषांनाच काय स्त्रियांनाहीं सहन होत नसे.

१९ वे शतक हे प्रबोधनाचे शतक समजले जाते. प्रबोधनाच्या काळात धर्मश्रध्दांना स्थान नसते, शास्त्रीय विचार पुढे येतो. लोकशाहीवादी व मानवतावादी मूल्ये मुसंडी मारून पुढे येतात. विवेक जागृत असतों, मानवी अस्तित्वाचा विचार होऊ लागतो. स्वातंत्र्य, समानता, बंधुत्व ही मूल्ये प्रकर्षाने पुढे येऊन स्थिर होऊ इच्छितात. समन्वय, सहकार्य व सामंजस्य यांना उचलून धरले जाते. प्रेम शांती यांचा उद्घोष होऊ लागतो. पण हे सारे प्रस्थापित करतांना होणाऱ्या विरोधाला साहसाने तोंड देण्याची तयारी ठेवावी लागते. वेळप्रसंगी बंड करण्यासाठी कंबर कसावी लागते.

समाजाला नवा विचार देणारे, परंपरा व धर्माचे बंधन झुगारून द्यायला लावणारे जे विचारवंत होवून गेले त्यात लोकहितवादी गोपाळ गणेश आगरकर व फुले दांपत्यांचा आवर्जुन उल्लेख करावा लागतो. एका प्रतिकूल परिस्थितीत फुले दांपत्याने केलेले सामाजिक व शैक्षणिक कार्य म्हणजे बहुजन समाजाच्या उत्थापनाचा महामार्ग ठरला. त्यांनी समाजातल्या शेवटच्या वर्गाला व व्यक्तीला पुढे घेतले. त्याला प्रेम दिले, माया दिली, आश्रय दिला. त्याला शिकता यावे म्हणून शाळा उघडल्या. त्यांनी दलित वर्ग व मुलींच्या शाळा काढल्या. त्यांना काळाची गरज कळली होती. त्यांचा हा दृष्टीकोन दूरदृष्टीचे निदर्शक आहे. जर एखादा भाग मागे राहिला तर साऱ्या समाजाची गती मंदावते, स्त्री अशिक्षित राहिली तर सारा समाज सांस्कृतिकदृष्टया लंगडा होतो हे जाणूनच फुल्यांनी दलित शिक्षण व स्त्री शिक्षणाला प्राधान्य दिले.

सावित्रीबाई फुले यांचा जन्म ०३ जानेवारी १८३१ रोजी नायगाव, सातारा येथे खंडोजी नवसे यांच्या कुटुंबात झाला. घरच्या चांगल्या संस्कारांचा मुळातच तल्लख बुध्दीच्या सावित्रीवर चांगला परिणाम झाला. सावित्रीबाईंचा विवाह महात्मा ज्योतीराव फुले यांच्याशी १८४० साली झाला. महात्मा फुले आणि सावित्रीबाई यांच्या जीवनाला आकार व ध्येय देण्यात सगुणाबाई या फुल्यांच्या मावसबहिणीचा मोठा वाटा आहे. ज्योतीबांना शाळेत घातले ही घटना उच्चवर्णियांना रूचली नाही. त्यांमुळे काही काळ जोतिबांचे शिक्षण बंद पडले. पुढे सगुणाबाईच्या पुढाकाराने त्यांचे शिक्षण पूर्ण झाले. महात्मा फुले हे प्रज्ञावान व विचारवंत क्रांतिकारक असल्याने त्यांनी आपल्या पत्नीला केवळ शिकवलेच नाही तर आपल्याच शाळेत शिक्षिका म्हणून नेमले. आपल्या पत्नीला सावित्रीबाईना महाराष्ट्राचीच नव्हे तर भारताची आद्य शिक्षिका हे राष्ट्रीय सन्मानाचं पद मिळवून देणारे पहिले थोर शिक्षणतज्ञही आहेत. महात्मा जोतीरावांनी १८४८ मधे मुलींची पहिली शाळा भिडे यांच्या वाड्यात पुण्यात सुरू केली ही तर क्रांतिकारक घटना आहेच पण त्यापेक्षा सावित्रीबाईनी जोतीरावांच स्वप्न साकार करून क्रांतिज्योती हे विशेषण सार्थ केलं ही घटना अधिक क्रांतिकारक आहे. थोर विचारवंत प्रा. गं. बा. सरदार म्हणतात, 'सावित्रीबाई या महात्मा फुलेंच्या फक्त पत्नी आहेत असं नाही; तर महाराष्ट्रातल्या स्त्री मुक्ती चळवळीतल्या त्या आद्य प्रणेत्याही आहेत.' आचार्य दादा धर्माधिकारी यांना फुले दांपत्यात क्रांतिकारकात्वाचा साक्षात्कार झालेला दिसून येतो ते म्हणतात, 'सावित्रीबाई भारतातली पहिली व थोर क्रांतिकारक स्त्री होती. जोतीबा व सावित्री हे दोघेही आपापल्या परीने क्रांतीचे अग्रदूत होते. जोतिबांच कर्तृत्व व ऊर्जा सावित्रीबाईच्या अंगी बाणली.'

शाळा काढण्यापेक्षा शाळा चालवणे अधिक त्रासदायक असत हे तर सर्वविदित सत्य आहेच. पण भारतातील कोणत्याही शिक्षकाच्या वाट्याला आल्या नसतील तेवढया असह्य यातना, छळवाद, मानहानी, तेजोभंग आणि गलिच्छ विरोध सावित्रीबाईंनी सहन केला. त्यातून त्यांच व्यक्तिमत्व तावून सुलाखून बाहेर पडलं आणि त्या क्रांतिबांना शोभतील अशा क्रांतिज्योती ठरल्या. त्यांचा जीवनानुभव दिव्य आणि दाहकही होता. शाळेत जाताना सनातन्यांनी शेण मारलं, दगड मारले, अपशब्द वापरले. पण निश्चयी सावित्रीबाईंनी या प्रकाराकडे कस पाहिलं! त्या शेण, दगड मारणाऱ्यांना म्हणतात, 'माझ्या लहानथोर बंधूनो, मी तुमच्याच धाकटया भगिनींना शिकविण्याचं पवित्र कार्य करीत आहे. मला उत्तेजन देण्यासाठी आपण माझ्यावर शेण अगर दगड फेकीत नसून ही फुले उधळीत आहात. तुमच हे कृत्य मला अस शिकवतं की, मी नेहमी अशीच आपल्या भगिनींची सेवा करीत राहावं. ईश्वर तुम्हाला सुखी ठेवो!'

स्विकृत कार्याविषयी जे अविचल प्रेम बाळगतात त्यांचचं कार्य पुढे जातं, ऐतिहासिक होतं.

कवयित्री - सावित्रीबाई हया जशा शिक्षणक्षेत्रातील 'आद्यशिक्षिका' होत्या तशाच त्या मराठी साहित्य क्षेत्रातील आद्य कवयित्री होत्या. १८५४ साली सावित्रीबाईंनी 'काव्यफुले' हा काव्य संग्रह प्रसिध्द केला. ४१ कविता असलेल्या या काव्य संग्रहात निसर्ग वर्णने व बोधपर कविता आहेत.

१८९२ साली 'बावन्न कशी सुबोध रत्नाकर' ही बावन्न कडव्यांची काव्य रचना प्रसिध्द केली. जीवन संवर्धन करणे व जीवननिष्ठा बळकट करणे असे त्यांचे या कविता लिहीण्यामागे हेतू होते. या दोन कविता संग्रहावरून त्यांना 'आधुनिक मराठी कवितेची आद्य कवयित्री' हा साहित्य क्षेत्रातील सन्माननीय बहुमानही प्राप्त होतो. अर्वाचीन काव्यांच जनकत्व सावित्रीबाईंना बहाल करताना डॉ. कृ. प. देशपांडे म्हणतात, 'अद्याप पावेतो मराठी काव्याचे जनक केशव सुतांना (जन्म १८६६) संबोधण्यात येते, या मतात बदल करायला हवा. सावित्रीबाईंचे काव्यविषयक व सौंदर्य वादाची वैशिष्टये पाहिल्यानंतर सावित्रीबाईंना अर्वाचीन मराठी काव्यांच्या जननी म्हणणे अधिक संयुक्तिक होईल. मानवता हा त्यांच्या विचार केंद्राचा गाभा होता.'

(१) संसारात आणि समाजात स्त्रीला अनंत संकटांना, यातनांना तोंड द्यावे लागते असे करत



असताना तिने कसे वागावे याचे दिग्दर्शन करताना सावित्रीबाई म्हणतात...

'शांतता आपली। ठेवावी प्रपंची
हीच वाट साची। संसारात.'

(२) मूलतः सारा निसर्ग, सारे मानव व सारे मानवी जीवन सुंदर आहे. मानवी विकृतींनी हे जीवन काळवंडून जाते. मुळातच असलेल्या या सौंदर्याचे जतन व संवर्धन करणे हे आपल्याच हातात आहे. दुसऱ्याबद्दल दयाबुध्दी, सहकार्याची वृत्ती व सद्भाव यांच्या सहाय्याने जीवन अधिकच सुंदर करता येवू शकते हे सांगताना त्या म्हणतात

'सुंदर. सृष्टी, सुंदर मानव, सुंदर जीवन सारे सद्भावाच्या पर्जन्याने बहरून टाकू वारे.'

(३) मनुवृत्ती व पेशवाईचा अंत म्हणजे शूद्रांना प्राप्त झालेल्या शिक्षण संधीचा आरंभ. अशा वातावरणात आपल्या समाजबांधवानी शिक्षणाचा लाभ घ्यायला पुढ सरसावले पाहिजे हे सावित्रीबाईंनी जोशपूर्ण भाषेत मांडले आहे. त्या म्हणतात

'उठा बंधूनो, अति शूद्रांनो, जागे होऊनी उठा
परंपरेची गुलामगिरी ही तोडणेसाठी उठा,
बंधूनो शिकणे साठी उठा...
गेले-मेले, मनू-पेशवे, आंग्लाई आली बंदी मनूची, विद्या घेण्या, होती ती उठली.'

(४) प्रत्येक माणसाला इतरांशी, निसर्गाशी व विश्वाशी आपले कोणत्या प्रकारचे नाते आहे हे जाणून घेण्याविषयी कुतुहल असते. सारे विश्व हे आपले घर आहे असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे.

सावित्रीबाई म्हणतात

'कधी कल्पी मी 'विश्व' मित्र आहे. काव्य माझे हे प्रति सृष्टी आहे.'

(५) सावित्रीबाईंनी आपल्या पतीबद्दल वाटणारा आदर असा काव्यबध्द केला आहे.

'तुकाराम जैसा तसा संत जोती सुधा ज्ञान देई जना रीती भाती।
पुढारी क्रियाशील द्रष्टा प्रसिध्दी. वदे जोती रूढी असे ती असिध्दी ।।'

(६) काव्य मुळात कसे असावे, आपण काव्य का लिहिले व वाचकांनी काव्यातून काय द्यावे हे सावित्रीबाईंनी अगदी साध्या सोप्या भाषेत सांगितले आहे ते असे

'मनी कल्पना छान गोष्टी रचावे जना ग्राहय होईल ऐसेचि गावे।
मनी इच्छुनी काव्य केले स्वभावे तुम्ही गाऊनी त्यातले सत्य घ्यावे।।'

सावित्रीबाईंनी वेळोवेळी विविध व्यक्तींना लिहिलेली पत्रे, व त्यांनी केलेली भाषणे यामधूनही त्यांचे प्रबोधनपर विचार व्यक्त झाले आहेत.

सावित्रीबाई महान होत्या. एक स्त्री, पत्नी, समाजमाता, क्रांतिज्योती, शिक्षणतज्ञ व कवयित्री अशा विविध भूमिका त्यांनी पार पाडल्या आणि आपली एक वेगळी प्रतिभाशाली प्रतिमा समाजासमोर ठेवली.

महात्मा फुले यांनी स्त्री-पुरूषात स्त्रीला श्रेष्ठ मानले. महात्मा गांधी आणि स्वामी विवेकानंद यांनीही स्त्रीला मानाचे स्थान दिले आहे. स्त्री समाजात माता, कन्या, बहिण, पत्नी, आजी या प्रमुख भूमिकांतून व नात्यांतून वावरत असते. स्त्री ही सहनशीलता व त्यागाचे प्रतीक समजली जाते. तिला खऱ्या अर्थाने सहचारिणी, सहधर्मिणी मानले पाहिजे. स्त्रीनेही तिची मूलभूत निसर्गदत्त सामर्थ्य टिकवली पाहिजे.

मानवतेचा ध्यास घेऊन जगलेल्या सावित्रीबाईंनी मानवतेच्या सेवेसाठीच प्राणार्पण केलं १८९७ मधे प्लेगच्या एका रोग्याला मुलाला दवाखान्यात नेताना प्लेगची लागण होऊन त्यांना वीरमृत्यू आला. म्हणूनच चरित्रकार डॉ. धंनजय कीर सावित्रीबाईंच वर्णन करताना म्हणतात

'एकोणिसाव्या शतकांतील स्त्रियांचा
उध्दार करणारे धीरोदात्त व्यक्तिमत्व। म्हणून ध्यानात असू द्या.

सावित्रीबाईंच्या निधनानंतर दहा वर्षांनी रशियन लेखक मॅक्झिम गॉर्की यांची 'मदर' ही कादंबरी १९०७ मधे प्रसिध्द झाली. या कादंबरीतील आई आपला मुलगा पवेल याला एके ठिकाणी म्हणते 'How can I help bing afraid. All my life I've been afraid. My soul is grown over with fear.' स्त्रीच्या मनातील हे भय दूर करण्याचे कार्य तिचा पिता, पती, पुत्र व समाज यांनीच करायचे आहे. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी आपल्याला मार्ग दाखवलेला आहे. त्या मार्गाने प्रामाणिकपणे प्रवास करणे गरजेचे आहे आणि त्यातच आपल्या प्रगतीचे मर्म, गमक आहे.

जयंती निमित्त विनम्र अभिवादन....

प्राचार्य डॉ. देवीदास जगनाडे
मोबा. नं. ९१५८८०२४७५

# विद्यार्थ्यांनों कृषि क्षेत्रातील नव-नवीन संधी शोधा

**- ता.कृषी अधिकारी रुपेश कांबळे**

देसाईगंज/प्रतिनिधी

कृषि क्षेत्राची व्याप्ती फार मोठी असून यात धान्य उत्पादन, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, भाजीपाला लागवड, फळफुले लागवड, तसेच यावर आधारीत प्रक्रीया उद्योग, मसाले पिके, कृषि पर्यटन आदी बाबी समाविष्ट असून देशाच्या विकासात कृषि क्षेत्राचा मोठा वाटा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनो कृषि क्षेत्रातील नव-नविन संधी शोधा, असे मत देसाईगंज तालुका कृषि अधिकारी रुपेश कांबळे यांनी व्यक्त केले. ते तुळशी येथिल शिवाजी विद्यालयात आयोजित कृषि विषयक मार्गदर्शन कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.




शिवाजी विद्यालय तुळशी येथे विद्यार्थ्यांसाठी कृषिविषयक मार्गदर्शन आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका कृषि अधिकारी रुपेश कांबळे होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून देसाईगंज तालुका उपकृषि अधिकारी भुषण देशमुख, मुख्याध्यापक विष्णू दुनेदार, नाशीक शेंडे, डी.एल.चुलपार उपस्थित होते. यावेळी कृषि ॲप, कृषि योजना या विषयी सुध्दा विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाचे संचलन कैलास गजापूरे यांनी तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक व्ही.एम. दुनेदार यांनी केले.

# ब्रम्हपुरीत तेली समाजाचा मेळावा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

श्री संताजी बहुउद्देशीय सेवा मंडळ व विदर्भातली समाज महासंघ ब्रम्हपुरी तालुक्याचा वतीने स्थानिक विठ्ठल रुक्मिणी सभागृहात तेली समाजाचा भव्य मेळावा नुकताच संपन्न झाला. या मेळाव्याचे उद्घाटन चंद्रपूर जिल्हा महासंघाचे अध्यक्ष प्रा. डॉक्टर राजेश बेले, अध्यक्ष डॉक्टर वरभे, तर रघुनाथ शेंडे, भाग्यवान खोब्रागडे, उमेशचंद्र चिलबुले, माजी नगराध्यक्ष रिता उराडे, तुळशीदास कुंघडकर, विनायक चिलबुले, प्रतिक हरणे, गोकुळदास बालपांडे, यशवंत आंबोरकर, ठाणेश्वर कायरकर, नामदेव लांजेवार, पॅरिलिना गौतम, अंजली वाडेकर, सुरेखा बालपांडे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

अर्चना मेहेर, शशिकला मदनकर संचाने सुमधुर स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. या मेळाव्यात ब्रम्हपुरी नगर परिषद निवडणुकीत नव्याने निवडून आलेले नगर सेवक डॉक्टर नितीन उराडे, मनोज कावळे, रंजना पिसे, राकेश पडोळे, चंद्रकांत बावनकुळे यांचा सन्मान चिन्ह, शाल श्रीफळ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात समाज प्रबोधन,गुणवंत गौरव, वर-वधू स्मरणिका प्रकाशन, ज्येष्ठ नागरिक सत्कार, वर वधू परिचय घेण्यात आले. गोवर्धन टिकले व अर्चना मरघडे यांना सन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले. वर वधू स्मरणिका प्रकाशन करताना संपादक राजेंद्र ठोंबरे यांनी या उपक्रमाची माहिती दिली.

प्रास्ताविक डॉ. सतीश कावळे,पाहुण्याचा परिचय प्रा. रवींद्र विखार यांनी तर संचालन जगदीश मेहेर यांनी केले. आभार प्रदर्शन मनिषा बंडे हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रामेश्वर राखाडे, सुयोग बालबुध्दे, नाथुजी कोल्हे, अरविंद साखरकर, पंढरी पिसे, रामकृष्ण कामडी, भाऊराव कावळे, अनंत कळंबे, जनार्दन कावळे, गणेश दांडेकर, मंजुषा साखरकर, कीर्ती झाडे, वनिता करंबे, सुधा बावनकुळे, विश्वपर्थाना कोल्हे, नेहा सेलोकर, माधुरी कावळे, ॲड. गिरडकर, परेश सेलोकर, संजय पिसे, यशवंत कामडींनी सहकार्य केले.

# डॉ. पंजाबराव देशमुख जयंती उत्साहात साजरी



ब्रम्हपुरी/का.प्र.

डॉ पंजाबराव देशमुख कन्या कनिष्ट महाविद्यालय तथा डॉ. पंजाबराव देशमुख कॉन्व्हेंट ब्रम्हपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्टातील शिक्षणप्रेमी तळमळीचे सामाजिक कार्यकर्ते व भारताचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. प्रकाशजी बगमारे होते. प्रमुख अतिथी म्हणून शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष तथा प्राचार्या मानिषाताई बगमारे, महाविद्यालयाच्या प्राचार्या शारदाताई ठाकरे, सुपरवायझर नीलिमा गुज्जेवार, प्रा. एच. के. बगमारे, प्रा.एस.के.खोब्रागडे, गोवर्धन दोनाडकर, निशा मेश्राम, वैशाली सोनकुसरे, प्रियका करंबे, वैशाली पिलारे, अस्विता सयाम, प्रतीक्षा निहाटे, संदेशा शेंडे, नेहा नवघडे, संजय नागोसे, मिलिंद राऊत आदी उपस्थित होते.

यावेळी संस्था अध्यक्ष प्रा. प्रकाश बगमारे यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. सोबतच उपस्थित मान्यवर अतिथींनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन नूतन ठाकरे व आभार प्रदर्शन जयघोष सहारे यांनी केले.

# राकेश पिल्लेवान यांची राज्यस्तरीय तबला वादन स्पर्धेकरीता निवड



ब्रम्हपुरी/का.प्र.

शालेय बालक्रीडा व सांस्कृतिक विभाग महाराष्ट्र राज्यातर्फे चंद्रपूर येथे पार पडलेल्या विभाग स्तरीय संगीत वाद्यवादन स्पर्धा डायट चंद्रपूर येथे पार पडल्या त्यात राकेश पिल्लेवान प्राथमिक शिक्षक बेलगांव जाणी प.स.ब्रम्हपुरी यांची राज्यस्तर संगीत वाद्यवादन स्पर्ध्ये करिता निवड झाली. त्यांच्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. राज्यस्तरीय स्पर्धा सांगली येथे होणार आहे.

# बेटाळयात श्रीमद भागवत सप्ताह समारोप




ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील बेटाळा येथील हनुमान मंदिर देवस्थान मंदिर यांच्या सौजन्याने मंगळवार दिनांक २३ डिसेंबर ते सोमवार दिनांक २९ डिसेंबर २०२५ पर्यंत भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञ सप्ताहाचे वाचन हरिभक्त परायण ज्ञानेश्वर बुराडे महाराज गुरुदेव सेवाश्रम नांदुरा (बुलढाणा) मु. डांबेविरली तालुका लाखांदूर यांच्या अमृततुल्य वानीतून सात दिवस लाभदायक प्रवचन झाले. सोमवार दिनांक २९ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता भागवत सप्ताह महायज्ञचा गोपालकाला व महाप्रसादाने समारोप करण्यात आला.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून कृष्णलाल सहारे माजी उपाध्यक्ष जिल्हा परिषद चंद्रपूर, उद्योजक दीपक ऊराडे, प्रमुख अतिथींमध्ये प्रेमलाल धोटे कॉन्ट्रॅक्टर, सुभाष नाकतोडे, सुधाकर झिलपे गुरुप्रसाद प्लायवूड, विष्णूजी तोंडरे मुख्याध्यापक, तुळशीदास राऊत सर, पोलीस पाटील चंद्रशेखर पुसलवार, अनिरुद्ध पाटील चौगान यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद राऊत तर आभार प्रदर्शन गुलशन राऊत यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी घनश्याम राऊत, प्रदीप राऊत, राजेंद्र पिलारे, धर्माजी दिवटे, प्रदीप राऊत, सोपान राऊत, संदीप शिलार, दीपक ढोंगे, धनराज राऊत, लुकेश राऊत, रितेश दाणी, गणेश राऊत, प्रणय धोटे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# तांत्रिक अडचणी दूर करून हळदा येथील प्रार्थना भवनाचे काम त्वरीत सुरू करा

ब्रह्मपुरी/का.प्र.


मागील वर्षी ब्रह्मपुरी तालुक्यातील हळदा येथे गुरुदेव सेवा मंडळाच्या प्रार्थना सभागृहासाठी तत्कालीन खासदार अशोक नेते यांनी निधी उपलब्ध करून दिला होता. सर्व प्रशाकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कामाला सुरुवात देखील झाली. परंतु काही कारणास्तव काम मध्येच बंद पडले. तांत्रिक अडचणीमुळे मागील एका वर्षा पासून काम बंद असल्याची व्यथा तनय देशकर यांच्या समोर गावकऱ्यांनी मांडली.

यावर सकारात्मक प्रतिसाद देत तनय देशकर यांनी ब्रह्मपुरी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. रविंद्रजी घुबडे साहेब व जिल्हा परिषदेचे कनिष्ठ अभियंता श्री. बावनकर साहेब यांची हळदा येथील गुरुदेव भक्तांसमवेत भेट घेतली व सदर कामातील तांत्रिक अडचणी दूर करत कामाला लवकरात लवकर सुरुवात करण्याची विनंती केली. यावेळी गटविकास अधिकारी श्री. रविंद्रजी घुबडे साहेब यांनी तत्काळ संबधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा करत त्वरित त्रुट्या दूर करण्याचे निर्देश दिले. यावेळी त्वरीत कार्यवाही करून कामाचा मार्ग मोकळा करू असा विश्वास गट विकास अधिकाऱ्यांनी शिष्यमंडळाला दिला.

# डॉ. धनराज खानोरकर यांचा 'सिमग्याच्या बोंबा अन् चवरीच्या शेंगा' काव्यसंग्रह प्रकाशित

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख कवी, लेखक डॉ धनराज खानोरकर यांच्या अस्सल झाडी बोलीतल्या विनोदी काव्यसंग्रहाचे प्रकाशन काटलीतील ३३ व्या झाडी बोली साहित्य संमेलनात बोली महर्षी डॉ हरिश्चंद्र बोरकर, ॲड लखनसिंह




कटरे, डॉ राजन जयस्वाल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डॉ हेमकृष्ण कापगते, ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर, डॉ संजय निंबेकर, लोकराम शेंडे, अरुण झगडकर, प्रा विनायक धानोरकर इ.मान्यवर उपस्थित होते.

सदर काव्यसंग्रह हा अस्सल झाडी बोलीतला मिस्किल विनोदी काव्यसंग्रह असून डॉ. खानोरकरांचा हा पाचवा काव्यसंग्रह आहे. मुंबईच्या संधीकाल प्रकाशनाने तो काढला असून नाशिकच्या डॉ.तुषार चांदवडकरांची प्रस्तावना व झाडी बोली चळवळीचे प्रवर्तक डॉ हरिश्चंद्र बोरकरांचे आशीर्वादपर भाष्य आहे. या कवितासंग्रहात झाडी बोली व्याकरणाचे नियम पाळले असून कवीने आपल्या मायबोलीत लिहिलेले आणि पोटभर हसवून प्रसंगी गंभीरही करणारे कवी धनराजचे हे अस्सल धन आहे, असा आशीर्वाद झाडी बोली प्रवर्तक डॉ हरिश्चंद्र बोरकरांनी दिला आहे.

# महाराष्ट्र विद्यालयात जनजाती गौरव दिन साजरा




ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील महाराष्ट्र विद्यालय पिंपळगाव भो. येथे १५ नोव्हेंबर २०२५ ला भगवान बिरसा मुंडा जयंती दिन हा जनजाती गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक ओमप्रकाश बगमारे सर तर प्रमुख अतिथी रुपेश पुरी सर, राजेश कऱ्हाडे सर, महाले सर, घ्यार सर, नाकाडे सर, मेश्राम सर व शिक्षकेतर कर्मचारी होते. या दिनानिमित्त सडमाके सर यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवन चारित्रावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याबद्दल माहिती देण्यात आली. तसेच आयोजित हस्तकला प्रदर्शनीमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्यपूर्ण हाताने निरनिराळ्या वस्तू, शोभिवंत उपकरणे, अनेक प्रकारच्या भेटवस्तू तयार करून आपली हस्तकला प्रदर्शित केली. उत्कृष्ट हस्तकला तयार करणाऱ्या प्रथम, द्वितीय व तृतीय बक्षीसाचे वितरण करण्यात आले तसेच प्रथम सत्र परीक्षेचा वर्ग पाच ते आठ चा निकाल जाहीर करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गावकर सर यांनी तर आभार प्रदर्शन अंशुल राऊत मॅडम यांनी केले.

# गाडगे बाबा जयंती महोत्सव व सामूहिक विवाह सोहळ्याच्या तयारीकरीता बैठक

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुका श्रीसंत गाडगेबाबा धोबी समाज सेवा मंडळाची महत्वपूर्ण बैठक



लोकमान्य टिळक वाचनालय, ब्रम्हपुरी येथे नुकतीच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीमध्ये दरवर्षीप्रमाणे येत्या वर्षी दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी श्रीसंत गाडगेबाबा यांचा १५० वा जयंती महोत्सव व सामूहिक विवाह सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

या सभेला समाजातील जेष्ठ नागरिक, समाज बांधव, माता-भगिनी, युवक कार्यकर्ते तसेच महिला व पुरुष मंडळाचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच ब्रम्हपुरी तालुका श्रीसंत गाडगेबाबा धोबी/व समाज सेवा महिला मंडळाची स्वतंत्र बैठकही लोकमान्य टिळक वाचनालय येथेच पार पडली. या बैठकीत दि. १७ जानेवारी २०२६ (शनिवार) रोजी मकर संक्रांतीनिमित्त समाजातील महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

या उपक्रमांमुळे समाजात सामाजिक ऐक्य, संस्कार व परंपरा जपण्यास मोठे योगदान मिळणार असून सर्व समाजबांधवांनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

# ब्रम्हपुरी-नागपूर महामार्गावर एस.टी. बसच्या फेऱ्या वाढवा

ब्रम्हपुरी-नागपूर मार्गावर एसटीच्या फेऱ्या वाढवा

ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्यात अनेक एस .टी . बसस्थानकांचे नूतनीकरण, सौंदर्यीकरण सुरू आहे ही अभिमानास्पद बाब आहे. सोबतच बस आगारात पुरेश्या बसेस, वाहक , चालक असणे पण फार गरजेचे आहे. ब्रम्हपुरी ते नागपूरला जाण्यासाठी ब्रम्हपुरी बस आगारातून फारच कमी बस फेऱ्यांची संख्या आहे . ब्रम्हपुरी वरून सकाळी सहा वाजता, दहा वाजता व दुपारी एक वाजता अशा फक्त नागपूर साठी तीनच बस फेऱ्या आहेत.

ब्रम्हपुरी ची लोकसंख्या व प्रवासी संख्या पाहता या फेऱ्या फारच कमी आहे कारण ब्रम्हपुरी च्या आजूबाजूची लोकसंख्या एक लाखापेक्षा जास्त आहे. त्यामुळे प्रवाशांची खूपच गैरसोय होते. तसेच शासनाने दिव्यांग व्यक्ती, स्त्रीयांना व ज्यांची पासष्ट वर्षे पूर्ण झालेली आहेत त्यांच्यासाठी विविध योजना लागू केलेल्या आहेत. परंतू वेळेवर बसेस च उपलब्ध राहत नाही त्यामुळे या योजनांचा प्रवाशांना लाभच घेता येत नाही व शेवटी नाईलाजास्तव पूर्ण तिकिट काढून खाजगी ट्रॅव्हल्स ने त्यांना प्रवास करावा लागतो. आगाराला फक्त भौतीक सुविधा देऊन चालत नाही तर आगारात पुरेश्या बसेस, चालक व वाहक संख्या पण लोकसंख्येच्या अनुपातामध्ये असायला पाहिजेत. याचा फायदा खाजगी ट्रॅव्हल्स ला होत असते. प्रवासी एस.टी. बस ची वाट पाहून थकून जातात व शेवटी खाजगी ट्रॅव्हल्स चा पर्याय निवडतात. ही समस्या दूर करण्यासाठी ब्रम्हपुरी नागपूर एस. टी. बस फेऱ्या संख्या वाढविण्याची मागणी राजू भागवत, समाजसेवक यांनी आगार प्रमुख तसेच उपविभागीय अधिकारी यांचे मार्फत राज्य परिवहन मंत्री तथा अध्यक्ष MSRTC प्रताप सरनाईक यांचेकडे केलेली आहे.

**जल ही जीवन है...**

**... QUOTES ...**

"The best part of life is not just surviving, but thriving with passion and compassion and humor and style and generosity and kindness."
- Maya Angelou

**चारोळी**

वाईट लोकांशी चांगलं वागतांना
त्याला फार वाईट वाटतं...
मधुमेहींना साखर वाटणे,
त्याच्या फार जीवावर येतं...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एलएमबी स्कुलमध्ये खिसमस सण साजरा




ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक एल.एम.बी. पाब्लिक स्कूलमध्ये खिसमस/नाताळ हा सण दिनांक २४ डिसेंबर २०२५ ला पार पाडण्यात आला. या कार्यक्रमामध्ये वॉल हॅंगीग ची ॲक्टीव्हीटी घेण्यात आली आणि केक कटिंग करुन हा कार्यक्रम पार पाडण्यात आला.

प्रसंगी विद्यार्थ्यांनी सांन्ता क्लॉजची वेशभूषा साकारली होती. जिंगल बेल च्या ताला सुरा मध्ये मुलांनी नृत्य सादर केले. नाताळ या सणाबद्दल माहिती सांगण्यात आली आणि हा सन यशु खिस्ताचा जन्म दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. असे या सणाचे महत्व मुलांना समजवून देण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये प्राचार्य कादिर कुरेशी सरांनी मुलांसोबत केक कटिंग केले. यावेळी उपमुख्याध्यापिका राठी मॅडम व पर्यवेक्षिका झोडे मॅडम उपस्थित होत्या आणि प्रि-स्कुलच्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी खिसमस सनाच्या उत्साहास प्रतिसाद दिला.

# ५३ वी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

शिक्षण विभाग पंचायत समिती ब्रह्मपुरी द्वारा आयोजित ५३ व्या तीन दिवसीय तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन तथा शिक्षकाचे शैक्षणिक साहित्य प्रदर्शन महाराष्ट्र विद्यालय पिंपळगाव भोसले येथे पार पडले. तालुक्यातील ७८ बालवैज्ञानिकांनी एकापेक्षा एक सरस मॉडेल तयार करून प्रदर्शनीत सहभागी झाले.



प्रदर्शनीचे उद्घाटन रवींद्र घुबडे गटविकास अधिकारी ब्रह्मपुरी यांचे हस्ते पार पडले. अध्यक्षस्थानी श्रीमती विमल नरहरी कऱ्हाडे अध्यक्ष महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ पिंपळगाव होते. प्रमुख अतिथी सुरेश दुनेदार सरपंच ग्रामपंचायत पिंपळगाव, केशवराव भुते माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती ब्रह्मपुरी, उमाजी कुथे माजी जिल्हा परिषद सदस्य , राजेश कऱ्हाडे, प्रशांत कऱ्हाडे, प्रवीण कऱ्हाडे संस्था सदस्य, वार्ताहर मधुकर मेश्राम, तालुक्यातील खाजगी विद्यालयाचे सर्व मुख्याध्यापक ,केंद्रप्रमुख तथा गट साधन व्यक्ती ब्रह्मपुरी उपस्थित होते. एन. एस. कोकोडे माजी प्राचार्य नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय ब्रह्मपुरी यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर करावे असे मोलाचे मार्गदर्शन केले.

या निमित्य विद्यार्थ्यांची निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा महाले सर, सचिन कऱ्हाडे सर, सडमाके सर, नाकाडे सर, गावडकर सर यांचे मार्गदर्शनाखाली घेण्यात आल्या. प्रथम ,द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना शिल्ड व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. बक्षीस वितरण कार्यक्रम माणिक खुणे साहेब माजी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती ब्रह्मपुरी यांचे अध्यक्षतेखाली तथा कृष्णाभाऊ सहारे माजी उपाध्यक्ष जिल्हा परिषद चंद्रपूर यांचे शुभ हस्ते गुणवंत माधव सेलोकर महाराष्ट्र विद्यालय पिंपळगाव माध्यमिक विभाग प्रथम क्रमांकाचे व इतर विद्यार्थ्यांना बक्षिसाचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी नायब तहसीलदार नीना बोबाटे तहसील कार्यालय ब्रह्मपुरी, निखिल लोंढे पोलीस पाटील पिंपळगाव व सर्व सन्माननीय मुख्याध्यापक मंडळी यांचे उपस्थितीत पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विद्या शेळके, अहवाल वाचन मुख्याध्यापक ओमप्रकाश बगमारे सर, संचालन रुपेश पुरी सर यांनी व आभार प्रदर्शन घ्यार सर यांनी केले. सफलतार्थ विद्यार्थी मंत्रिमंडळ, स्वयंसेवक व सर्व विद्यार्थ्यांनी मदत केली.


Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.


प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.

# बच्चू कडूंचा 03 जानेवारीला...

(पान क्र. १ वरून)

अंतर्गत कठोर कारवाई करावी. शेतकऱ्याकडून सावकारांनी बेकायदेशीरपणे वसूल केलेली रक्कम परत मिळवून द्यावी. ग्रामीण भागात शेतकऱ्यांची लूट करणाऱ्या मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या मनमानी कारभारावर कठोर निर्बंध लादण्यात यावेत.

हा मोर्चा मिंथूर येथील रोशन गुडे याच्या निवासस्थानापासून सुरू होईल आणि नागभीड तहसील कार्यालयावर धडकणार आहे. या मोर्चाच्या नियोजन समितीचे सदस्य आणि भाकप (CPI) नेते विनोद झोडगे तसेच राहुल पांडव यांनी परिसरातील सर्व शेतकऱ्यांना आणि नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# ब वर्गीकरणातून ब्रम्हपुरी आगार राज्यात प्रथम

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ कडून राज्यातील सर्व विभाग व आधाराचे मूल्यांकन व श्रेणीकरण दर महिन्याला केले जाते. आर्थिक वर्ष सन २०२५ ते २०२६ च्या नोव्हेंबर २०२५ मध्ये ब्रह्मपुरी आगारांमध्ये १०० पैकी ९४ गुण घेऊन महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आलेले आहे.

ब्रम्हपुरी आगार ब वर्गीकरण मध्ये येत असून यामध्ये नियतांचे चालन ४५ ते ६० यामध्ये आहे. ब्रम्हपुरी आगाराने महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावत ६५.६० लक्ष रुपयाचा नफा कमविला आहे. यामध्ये सवलतीसह उत्पन्नामध्ये १० पैकी १० गुण, मार्ग बंद वाहनाचा परिमाणामध्ये १० पैकी १० गुण, चालक व वाहकांची कमतरता असताना कमी चालक वाहकांमध्ये वाहतुकीचे योग्य नियोजन करून बस स्टॉप परिणामांमध्ये १० पैकी १० गुण तसेच रस्ते खराब असताना सुद्धा अपघाताचे प्रमाण कमी असल्याने अपघात परिणामांमध्ये १० पैकी १० गुण प्राप्त झालेले आहेत. याकरिता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळा च्या वतीने मूल्यांकन व श्रेणी करून उत्कृष्ट कामगिरी करीत ब्रह्मपुरी आगार राज्यात प्रथम स्थान पटकावले आहे.

झाडे लावा, झाडे जगवा...

Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404